# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २१७ वा ❑ भारतीय सौर दिनांक २८ आश्विन शके १९४८, गुरूवार दि.२२ ऑक्टोंबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### पुणे महानगरपालिकेच्या निष्काळजीपणाचा बळी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आणि विद्येचे माहेरघर अशी ओळख असलेल्या पुणे शहरात गेल्या काही काळापासून विकासाच्या नावाखाली नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा एक अतिशय संतापजनक आणि विदारक प्रकार सुरू आहे. प्रशासकीय ढिसाळ कारभार, अधिकाऱ्यांचा नाकर्तेपणा आणि कंत्राटदारांची नफेखोरी या दुष्टचक्रात सामान्य माणसाचा कसा नाहक बळी जातो, याचा आणखी एक भयंकर पुरावा नुकताच समोर आला आहे. पुणे शहरातील येरवडा येथील मच्छी मार्केट परिसरात सांडपाणी वाहिनीच्या कामासाठी खोदलेल्या खड्ड्यात पडून एका निष्पाप नागरिकाला आपला जीव गमवावा लागला. ही हृदयद्रावक घटना १७ ऑक्टोबर रोजी घडली असून, या घटनेने केवळ येरवडा परिसरच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे आणि प्रशासनाच्या असंवेदनशीलतेवर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या घटनेचा सविस्तर आढावा घेतल्यास प्रशासनाची घोर बेपर्वाई उघड होते. येरवडा येथील मच्छी मार्केट या कायम गजबजलेल्या आणि वर्दळीच्या ठिकाणी सांडपाणी वाहिनीच्या (भूमिगत गटार योजनेच्या) दुरुस्तीचे आणि विस्तारीकरणाचे काम सुरू होते. या कामासाठी प्रशासनाने आणि संबंधित कंत्राटदाराने रस्त्याच्या मधोमध तब्बल १० ते १५ फूट खोल खड्डा खोदून ठेवला होता. सर्वात धक्कादायक आणि संतापजनक बाब म्हणजे, इतका खोल खड्डा खोदूनही त्याच्या आजूबाजूला सुरक्षेचे कोणतेही कठडे उभारण्यात आले नव्हते. नागरिकांना धोक्याचा इशारा देणारे फलक, रात्रीच्या वेळी दिसणारे लाल दिवे किंवा साधे दोरखंड बांधण्याची तसदीही महापालिकेच्या संबंधित विभागाने घेतली नव्हती. १७ ऑक्टोबर रोजी प्रदीप परदेशी नावाचे एक गृहस्थ याच रस्त्यावरून पायी चालत निघाले होते. रस्त्यावर खड्डा असल्याने रस्ता अरुंद झाला होता, त्याचवेळी समोरून भरधाव आलेल्या एका रिक्षाने त्यांना जोरदार धडक दिली. या अचानक बसलेल्या धक्क्यामुळे प्रदीप परदेशी यांचा तोल गेला आणि ते थेट त्या १० ते १५ फूट खोल उघड्या खड्ड्यात कोसळले. खड्डा अत्यंत खोल असल्याने आणि डोक्याला तसेच शरीराला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. एका क्षणात एका हसत्याखेळत्या कुटुंबाचा आधार कायमचा हिरावला गेला.

हा मृत्यू केवळ एक दुर्दैवी अपघात मानून सोडून देण्यासारखा अजिबात नाही, तर हा व्यवस्थेने केलेला एक प्रकारचा निर्घृण खूनच आहे. विकासाचे मोठमोठे ढोल बडवणाऱ्या आणि शहर सुधारणेच्या गप्पा मारणाऱ्या महानगरपालिकेला आपल्याच करदात्या नागरिकांच्या जिवाची काहीच किंमत उरलेली नाही का, हा अत्यंत बोचरा प्रश्न या निमित्ताने ऐरणीवर आला आहे. शहरात ठिकठिकाणी रस्ते खोदले जातात, मात्र ते महिनोनमहिने बुजवले जात नाहीत. कंत्राटदारांना कामे देताना सुरक्षिततेच्या अटींचे काटेकोरपणे पालन करण्याचे नियम फक्त कागदावरच राहतात आणि प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी मात्र सर्व नियमांची पायमल्ली केली जाते. प्रदीप परदेशी यांच्या मृत्यूला रिक्षाचालकाची धडक हे जरी तात्कालिक कारण असले, तरी खरा आणि मुख्य गुन्हेगार ती भ्रष्ट व्यवस्था आहे, जिने तो मृत्यूचा सापळा भररस्त्यात उघडा सोडला होता. जर त्या खड्ड्याभोवती सुरक्षेचे लोखंडी किंवा लाकडी कठडे असते, तर प्रदीप परदेशी खड्ड्यात पडलेच नसते आणि आज ते आपल्या कुटुंबात जिवंत असते.

या भीषण घटनेने पुणे महानगरपालिकेच्या कार्यपद्धतीवर आणि प्रशासकीय यंत्रणेच्या उत्तरदायित्वावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. आता केवळ दिखाऊ चौकशी समित्या नेमून, बोटचेपी भूमिका घेऊन आणि एखाद्या कनिष्ठ कर्मचाऱ्याला निलंबित करून हा प्रश्न सुटणार नाही. या मृत्यूला थेट जबाबदार असणाऱ्या संबंधित कंत्राटदारावर आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षेची पाहणी न करणाऱ्या महापालिकेच्या वरिष्ठ अभियंत्यांवर सदोष मनुष्यवधाचा थेट गुन्हा दाखल व्हायला हवा. जोपर्यंत प्रशासनातील अधिकाऱ्यांना आणि नियम धाब्यावर बसवणाऱ्या कंत्राटदारांना कठोर शिक्षेची भीती वाटत नाही, तोपर्यंत नागरिकांच्या जिवाशी सुरू असलेला हा जीवघेणा खेळ थांबणार नाही. १७ ऑक्टोबर ची ही घटना प्रशासनासाठी धोक्याची मोठी घंटा आहे. भविष्यात अशा घटना टाळायच्या असतील, तर विकासकामांच्या ठिकाणी सुरक्षेच्या बाबतीत शून्य तडजोड धोरण अत्यंत कठोरपणे राबवणे गरजेचे आहे, अन्यथा सामान्य माणसाला घराबाहेर पडताना दररोज आपला जीव मुठीत धरूनच जगावे लागेल.

## रा.स्व.संघाचा कर्वेनगरमध्ये शस्त्रपूजन आणि विजयादशमी उत्सव उत्साहात





**ज्योतिर्मय साहित्य**

कर्वेनगर, पुणे - मंगळवार दिनांक २० ऑक्टोबर २०२६ रोजी कर्वेनगर परिसरात सायंकाळी ५ ते ८ या वेळेत शस्त्रपूजन आणि विजयादशमी उत्सव अत्यंत उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगर कार्यवाह चेतन भिसे यांनी केले.त्यांनी कर्वे नगरमध्ये चालणाऱ्या विविध सामाजिक प्रकल्पाची माहिती दिली.

या शस्त्रपूजन उत्सव कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून कर्वेनगर येथील जेम्स (टोळ) हॉस्पिटलच्या संचालिका व सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर सौ चारुलता बापये ह्या उपस्थित होत्या.

या भव्य कार्यक्रमामध्ये ५०० स्वयंसेवक पूर्ण गणवेशात सहभागी झाले होते,तर सुमारे ३०० नागरिक देखील या सोहळ्याचे साक्षीदार बनले.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात संघ कार्यातील कुटुंब प्रबोधन या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.प्रमुख वक्ते पुणे महानगर कुटुंब प्रबोधन संयोजक अभय ठकार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना उद्देश आणि संघाच्या शंभर वर्षांच्या प्रवासाचा इतिहास उपस्थितांसमोर मांडला.

या कार्यक्रमाला कर्वेनगर संघचालक उदयन पाठक प्रामुख्याने उपस्थित होते.उपस्थित नागरिकांमध्ये महिलांची,महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात होती.

संचालनास कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या मैदानापासून निघून कॅनाल राष्ट्र,भालेकर वस्ती,इंगळे नगर, डॉ आंबेडकर चौक,हिंगणे होम चौक,कर्वे नगर पूल मार्गे गेट क्रमांक दोन कर्वे संस्थेच्या मैदानावर सांगता झाली. कर्वे नगरमधील स्थानिक नागरिकांनी या शिस्तबद्ध संचलनाचे आणि कार्यक्रमाचे ठिकठिकाणी उस्फुर्त सहर्ष स्वागत केले.

## विविध स्पर्धांमध्ये मोहिते मळा शाळेचे घवघवीत यश

### विद्यार्थ्यांच्या यशाने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा; तालुकास्तरीय स्पर्धांसाठी निवड

**ज्योतिर्मय साहित्य**

मोहिते मळा (चितळी)- स्वर्गीय यशवंतराव चव्हाण बाल क्रीडा स्पर्धांसह विविध शैक्षणिक व साहित्यिक स्पर्धांमध्ये जिल्हा परिषद शाळा मोहिते मळा येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक वाटचालीला नवी दिशा मिळाली असून, परिसरातून विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण बाल क्रीडा स्पर्धेच्या अनुषंगाने आयोजित योगासन स्पर्धेत इयत्ता चौथीतील विराज संतोष मोहिते याने बीटस्तरावर प्रथम क्रमांक मिळवून तालुकास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. त्याच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत मानाची भर पडली आहे.

तसेच इयत्ता चौथीतील आरोही अरुण पुंडेकर हिने केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धा व हस्ताक्षर स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व लेखनकौशल्याला प्रोत्साहन देणारे शाळेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेले हस्तलिखितही तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवडले गेले आहे.

साहित्य क्षेत्रातही मोहिते मळा शाळेने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अनुषंगाने 'कवितेचे गाव' जकातवाडी येथे आयोजित नांदी संमेलनात इयत्ता चौथीतील सृष्टी सागर मोहिते आणि आरोही अरुण पुंडेकर यांनी लिहिलेल्या कवितांची निवड झाली. या कवितांचे सादरीकरण करण्याची संधीही विद्यार्थिनींना मिळाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या साहित्यिक प्रतिभेला मिळालेली ही संधी विशेष उल्लेखनीय आहे.




लोकसहभागातून शाळेचा कायापालट!

मोहिते मळा येथील शाळेचा विकास शिक्षणप्रेमी, पालक आणि ग्रामस्थ यांच्या लोकसहभागातून होत आहे. शाळेच्या भौतिक विकासासोबतच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक व साहित्यिक गुणवत्तेला चालना देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचे काम शाळेत केले जात आहे.

मर्यादित साधनसुविधा असतानाही जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर एका छोट्याशा ग्रामीण शाळेने मिळवलेले हे यश इतर शाळांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाराम गायकवाड सर व उपशिक्षिका सौ. रंजना सानप यांचेही शाळा व्यवस्थापन समितीने कौतुक केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल केंद्रप्रमुख सौ. नसीमा इनामदार, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. अमृता संतोष मोहिते, ग्रामपंचायत सदस्य

श्री. कुमार मोहिते, उपाध्यक्षा सौ. माधुरी सागर मोहिते, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, पालक व ग्रामस्थ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला लोकसहभागाची जोड आणि शिक्षकांच्या प्रयत्नांना ग्रामस्थांची साथ मिळाल्यास ग्रामीण भागातील शाळाही यशाची नवी शिखरे गाठू शकतात, याची प्रचिती मोहिते मळा शाळेच्या या यशातून येत आहे.

## संवाद....

**ज्योतिर्मय साहित्य**

आजच्या काळात परस्परातील संवाद कमी होत चालला आहे हे सत्य आहे. घराघरात विचारांचे आदान प्रदान कमी झालेले आहे. जग जवळ आले पण माणूस माणसापासून दूर जात आहे हे आजचे कटू सत्य आहे. विवीध यांत्रिक उपकरणांची भरमार झाली आहे त्यासोबतच मानवाची मनेही यंत्रवत झाली आहेत. याला कारण आपण भ्रमणध्वनी आणि दुरदर्शनला जबाबदार धरतो. ते तर जबाबदार आहेतच पण यासोबतच मानवामध्ये असलेले काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे विकार देखील कारणीभूत आहेत.

भ्रमणध्वनी आजच्या काळाची गरज आहे. पण तो गरजेपुरता वापरला जात नाही. त्यात असणारे वेगवेगळे कार्यक्रम मग ते कोणत्या दर्जाचे आहेत याचा विचार न करता अतिशय आनंदाने बहुतांशी जन मनोरंजन म्हणून पाहतात.मग ते पाहत असताना कुणी हाक मारली, कुणी बोलावले काहीही त्यांना ऐकू येत नाही. कारण त्यांना बाह्य जगाची गरजच उरलेली नाही.



काही ठिकाणी तर घरातल्या लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांकडे भ्रमणध्वनी आहेत आणि ते त्यात इतके गर्क असतात की जवळपास त्यांच्यातील संवाद न च्या बरोबर असतो. दुरदर्शनची गोष्ट याहून वेगळी नाही. क्रिकेटचा सामना असताना तर भूक तहान विसरून ते दुरदर्शनमध्ये गर्क असतात. अर्थात भ्रमणध्वनी आणि दुरदर्शन ही उपयोगी उपकरणे आहेत. त्याचा योग्य आणि अचूक वापर कसा करावा हे खरेतर प्रत्येकानी समजून घेतले पाहिजे. अतिशय संवेदनशील ही उपकरणे आहेत. पालकांना जागृत राहून आपली पाल्ये काय पाहतात हे जाणून घेणे आवश्यक आहे. पालक व मुले यांच्यातील संवाद कमी होऊ नये यासाठी पालकांनी दररोज एक ते दोन तास मुलांसोबत घालवले पाहिजेत. त्यांच्या भावना जाणून घेतल्या पाहिजेत आणि चुकीच्या गोष्टीपासून मुलांना परावृत्त करायला पाहिजे.

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे मानवाचे षड्रिपू आहेत. आजच्या काळात हे प्रमाण खुप वाढलेले आहे. त्यावर विजय मिळवणे ही सोपी गोष्ट नाही पण प्रयत्नाने काही अंशी नियंत्रण मिळवू शकतो. आपण सामान्य लोकं. वाईट गोष्टीचा राग येणारचं. संपत्तीचा लोभ राहणारच. पण आपल्या पूर्वजांपेक्षा आपल्यात हे विकार जास्त बळावत चालले आहेत. मने संकुचित झालेली आहेत. आईवडिलांविषयी केवळ संपत्तीपुरते प्रेम उरले आहे. बरेच जण आईवडिलांना वृद्धाश्रमात ठेवतात.




अर्थात सर्वच तसे असतात असे नाही. एकमताने एकत्र खेळणा-या बहिण भावामध्ये लग्नानंतर दुरावा दिसून येतो. खुप संपत्ती असूनही आईवडीलांनी मुलींना थोडाही भाग दिल्याचे आवडत नाही. हे सर्व विकारांनी निर्माण झालेले खेळ आहेत. समजुतदारपणापेक्षा हेवेदावे, मत्सर वाढलेले आहेत.

का अशा क्षुल्लक गोष्टीतून दुरावा निर्माण होऊन आपसातील संवाद बंद झालेले आहेत. समाजात आजच्या घडीला अनेक बहिणींची दिवाळी होत नाही. बहिण भावाचं नातं इतकच मर्यादित आहे का? आपण सध्या मृत्युलोकात जगतोय. एक दिवस प्रत्येकाला पुढच्या प्रवासाला निघायचं आहे. कोण जाणे, पुढचा जन्म मिळतो कि नाही आणि मिळाला तर आपण कुणाला ओळखणार नाही. धन, संपत्ती, ऐश्वर्य, आप्त सर्व इथेच राहणार. कोणी सोबत येणार नाही. म्हणून मानव जन्म मिळाला तर करून घ्या सत्कर्म. बोला सर्वांशी मोकळे. संवाद हा मन जाणण्याचा सर्वात उत्तम मार्ग आहे. जास्तीत जास्त संवाद साधा. विचारांचे मंथन होऊ द्या. समस्या येतील नी जातील संवाद हाच त्यावर रामबाण उपाय आहे.



## जात्यावरच्या ओव्या......

माय माऊलीची माया
आकाशात फिरे घार
काळजाचे तुकडे
तिच्या घरट्यात चार||८९९||

माय माऊलीची माया
जन्म देऊन गेली
आभाळाच्या कागदाला
नही लिहीता आली ||९००||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ८१




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

**मना मच्छरे नाम सांडू नको हो ।**
**अती आदरे हा निजध्यास राहो ।**
**समस्तांमधे नाम हे सार आहे ।**
**दुजी तूळणा तूळिता ही न साहे ।।८१।।**

अर्थ : हे मना, कोणत्याही प्रकारच्या मत्सराच्या आहारी जाऊन देवाचे नामस्मरण कधीही सोडू नकोस. इतरांचा हेवा करण्यात वेळ वाया घालवण्याऐवजी, अत्यंत आदराने व निष्ठेने भगवंताच्या नामाचा अखंड ध्यास घे. देवाचे नामस्मरण हेच सर्व श्रेष्ठ साधन आहे. त्याची तुलना अन्य कशाशीही करवत नाही.

(मच्छरे - मत्सराने, सांडू नको - सोडू नको, निजध्यास - मनाला ध्यास/ओढा लागणे, समस्तांमधे - ईश्वरप्राप्तीच्या सर्व साधनांमध्ये, दुजी -दुसरी, तूळिता - तुलना करता)




विवेचन : या श्लोकातही समर्थ नामाचा महिमा आपल्याला सांगतात. आधीच्या श्लोकात निर्धारपूर्वक ज्या मत्सराचा त्याग करायला समर्थांनी आपल्याला सांगितले, त्याचा उल्लेख या ठिकाणी पुन्हा येतो. मानवी स्वभाव असा आहे की जी गोष्ट आपल्याकडे नाही पण दुसऱ्याकडे आहे असे पाहिल्यावर त्या व्यक्तीबद्दल पहिली प्रतिक्रिया मनात येते ती म्हणजे मत्सर. हा मत्सर वाढत गेला की अनर्थ घडतो. नको त्या गोष्टी माणसाच्या हातून घडतात. गीतेत सांगितल्याप्रमाणे मत्सर हा आसुरी गुण आहे.

मागील काही श्लोकात हिरण्यकश्यपूचे उदाहरण आपण पाहिले आहे. हिरण्यकश्यपू राजा होता, सामर्थ्यवान होता, स्वतःच्या शक्तीचा त्याला गर्व होता, इथपर्यंत सर्व ठीक आहे. पण जेव्हा लोक त्याची स्तुती करायची सोडून परमेश्वराची स्तुती करतात, तेव्हा मात्र त्याच्या मनात भगवंताच्या नामाविषयी मत्सर निर्माण होतो. मग प्रजेने आपलेच नाम घ्यावे, भगवंताचे नाम कोणी घेऊ नये असा आदेश तो काढतो. पण त्याचा स्वतःचा मुलगाच विष्णुभक्त असतो. शेवटी मत्सर आणि द्वेषामुळे हिरण्यकश्यपूचा नाश होतो हे आपल्याला माहिती आहे.

काही लोकांना नकळत नामाबद्दलही द्वेष असतो. नामाने असे काय होणार आहे ? त्याला कशाला एवढे महत्व द्यायचे ? मग नकळत नामाबद्दल मनात मत्सर निर्माण होतो. नाम घ्यायला सुरुवात केली असेल तरी मग असा मनुष्य नाम घेणे सोडून देतो. म्हणून समर्थ म्हणतात की बाबारे, मत्सराच्या अधीन होऊन नाम घेणे सोडू नकोस. **(क्रमशः)**




## नामात असणे म्हणजेच शुद्धीवर असणे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

दारुड्यांच्या मेळाव्यात सारेच दारूच्या धुंदीत असतात. पण त्यांतल्या एखादा दारू न प्यालेला असला तर बाकीचे दारुडे त्याला 'हा शुद्धीवर नाही' असे म्हणत असतात. वास्तविक तोच एकटा शुद्धीवर असून बाकीचेच खरे गैरसावध असतात. त्याप्रमाणे, आपण सर्वजण विषयांत दंग असल्याकारणाने, जो नामात असतो त्याला आपण 'हा शुद्धीवर नाही' असे म्हणत असतो. वास्तविक पाहता, 'नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही ' अशी ज्याची दृढ भावना असते तोच खरा शुद्धीवर असतो, आपण मात्र भ्रमात असतो. आपल्याला झालेला हा भ्रम नाहीसा करायला तीन उपाय आहेत. एक सद्विचार, दुसरा सत्संगती, आणि तिसरा नामस्मरण. भगवंताचा विचार हाच खरा सद्विचार. एखाद्या माणसाला म्हटले, की तुझे अवयव आणि रंग यांच्याशिवाय ये, तर त्याला येता येणार नाही, कारण तो जिथे आहे तिथे त्याचा रंग आणि अवयव असणारच; त्याचप्रमाणे नाम, संत आणि भगवंत हे एकमेकांना चिकटूनच आहेत, त्यामुळे जिथे नाम आहे तिथे सत्संगती आणि भगवंत असतातच. वासरू घेऊन गेले म्हणजे जशी गाय पाठीमागून आपोआप येते, त्याप्रमाणे नाम घेतले की भगवंत त्यामागे येतोच. आजकाल इतकी यंत्रे निघाली आहेत, मग भगवंताच्या प्राप्तीसाठी संतांनी एखादे यंत्र शोधून काढले नाही का, असा प्रश्न एखाद्याच्या मनात येईल, तर त्याचे उत्तर सोपे आहे. असे यंत्र संतांनी केव्हाच शोधून काढले आहे. त्या यंत्राचे नाव आहे 'रामनाम.' हे यंत्र सर्वांना मिळू शकते, सर्वांना वापरता येते, शिवाय ते कधीच गंजत नाही.

भक्त, भगवंत आणि नाम हे तिन्ही एकरूपच आहेत. जिथे नाम आहे तिथे भक्त आहे, आणि तिथेच भगवंत आहे. म्हणून नाम सर्वांत श्रेष्ठ आहे. ते नाम अनन्य होऊन आपण घेऊ या. नाल्यातून, गटारातून पाणी वाहते, ते किती घाण असते ! पण ते नदीला मिळते आणि ती सागराला मिळते. सागर त्या सर्वांना सागररूप करून टाकतो. तसे मनुष्य कितीही पापी, दोषी, अपराधी असू द्या, त्याने नाम-नदीची कास धरली की तो रामसागररूप झालाच म्हणून समजा. भगवंताला विसरणे हे सर्वांत मोठे पाप आहे. नामाने भगवंताचे स्मरण होते म्हणून नामाने पाप नाहीसे होईल. अनाथ शब्द नाथावाचून नाही, आणि नाथाला अनाथावाचून नाथत्व नाही. राम सर्वांचा नाथ आहे. त्याच्या अखंड स्मरणात आपण राहू या. प्रपंच वनवासासारखा आहे. रामाच्या स्मरणात प्रपंचातली संकटे आणि दुःखे कस्पटाप्रमाणे वाटतील.

तुम्ही नाम घेत गेलात तर तुम्हांला संत धुंडीत जाण्याची जरूरीच नाही. तेच तुम्हांला धुंडीत येतील.

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

### आपले सण, आपले उत्सव
### शारदीय नवरात्र

■ नवरात्राचे चार प्रकार

१) चैत्र शुक्ल नवरात्र याला वासंतिक नवरात्र म्हणतात
२) आषाढ शुक्ल नवरात्र
३) आश्विन शुक्ल नवरात्र याला शारदीय नवरात्र म्हणतात
४) मग शुक्ल नवरात्र

वरील चार पैकी चैत्र व अश्विन नवरात्राला विशेष महत्त्व आहे

■ उपवास

नवरात्रातील नऊ दिवस उपवास करावा ही शक्य नसेल तर किमान तीन दिवस उपवास करावा.

ज्यांना अगदी शक्य नाही त्यांनी किमान सप्तमी अष्टमी व नवमी या तीन दिवशी तरी मातेचे पूजन करावे.

इतर व्रताच्या तुलनेत नवरात्र हे सर्वश्रेष्ठ असे व्रत आहे. हे धन धान्य प्रदान करणारे, सुख व संतान प्राप्ती करून देणारे, आरोग्य वृद्धिंगत करणारे आहे. याशिवाय स्वर्ग व मोक्ष देणारे हे व्रत आहे. ज्याला विद्या ( परमेश्वर प्राप्ती चे ज्ञान) मिळावी अशी अपेक्षा आहे, तो विद्यावान होतो. हे व्रत केल्याने सत्ता पद प्राप्त होते. नवरात्रीचे व्रत श्रीक्षेत्र माहूरगड येथे कसे साजरे होते. (क्रमशः)

## || अभंग-माधव ||



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



ठेवा सदा मनी । गोष्ट जी खूपते ।
वाईट नसते । दरवेळी ||१||
सुईचे ते अग्र । बोटाला टोचते ।
तरी ती शिवते । कापडाला ||२||
सुरीची ती धार । बोट ती कापते ।
भाजीही चिरते । सफाईने ||३||
चपलेचा खिळा । टोचतो टाचेला ।
पण चपलेला । सांधतसे ||४||
ध्यानात राहू दे । प्रत्येक गोष्टीचे ।
बुरे अन् साचे । रूप असे ||५||
माधव हा म्हणे । बाजू उपयुक्त ।
पहावी ती फक्त । प्रत्येकाची ||६||

## || श्री दत्त महिमा ||



लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड



### गुरु ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरु देवो महेश्वरा गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः

ज्योतिर्मय साहित्य

हा मंत्र सर्व भक्त मंडळींना पाठ आहे दत्तभक्त तर याचे नित्य स्मरण करतात.

गुरु शब्दाची उत्पत्ती दत्त महाराजांपासून झालेली आहे सांप्रतकाळात अनेक गुरुपरंपरा अस्तित्वात आहेत जसे गाणपत्य संप्रदाय, शाक्त संप्रदाय, नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, महानुभाव संप्रदाय असे अनेक संप्रदाय व त्यांची भिन्न भिन्न गुरुपरंपरा आहे.

प्रत्येकाची आप-आपल्या गुरूंची प्रतिमा श्रद्धास्थाने वेगवेगळे आहेत तरी पण कोणत्याही गुरुचे पूजन केले अर्चन केले तरी त्यांचा नमस्कार दत्त महाराजांच्या चरणी प्राप्त होतो.

जसे एक सुवचन आहे

''सर्व देव नमस्कारात केशव प्रती गच्छती''

गुरु ही अशी शक्ती आहे की जी आपल्यापेक्षा आपला शिष्य उच्च स्थानी पोहोचला तरी त्याबद्दल असूया किंवा खंत बाळगत नाहीत उलट त्यातच त्यांचा मोठेपणा असतो.



व्यवहारात आपण अनेक व्यक्ती पाहतो की जे आपल्यापेक्षा कनिष्ठ व्यक्ती आपल्यापेक्षा मोठ्या पदावर गेलेला सहन करू शकत नाहीत अगदी घरातील उदाहरण पाहिले की कोणी सुनेचे कौतुक केले की सासूला राग येतो. राजकारणातील नेतेमंडळी आपल्यापेक्षा छोटा कार्यकर्ता मोठा झाला तर त्यासही खंत वाटते,

प्रशासनातही अधिकारी लोक कनिष्ठ व्यक्तींना मोठी संधी मिळाली तर नाराज होतात.

असे अनेक दाखले आपल्या निदर्शनास येत असतात फक्त गुरु ही व्यक्ती अशी असते की आपल्यापेक्षा आपला शिष्य मोठा झाला तर आनंदी होतात.

उदाहरणार्थ विवेकानंद जगविख्यात झाले पण तेवढी प्रसिद्धी रामकृष्ण परमहंस यांना लाभली नाही.

भगवान श्रीकृष्ण यांच्या तुलनेने संदिपनी ऋषी कमी लोकांना परिचित आहेत.

प्रभू रामचंद्र यांचे गुरु कोण असा प्रश्न विचारल्यास अनेकांना उत्तर देता येणार नाही

लोकमान्य टिळक विख्यात राजकारणी नेते म्हणून प्रसिद्ध झाले मात्र गोपाळ कृष्ण गोखले फारसे ज्ञात नाहीत.

म्हणूनच संत ज्ञानेश्वर यांनी म्हटले आहे सद्गुरु सारिखा असता पाठीराखा
इतरांचा लेखा कोण करी
राजीयाची कांता काय भीक मागे
मनाच्या जोगे सिद्धी पावे
कल्पतरू तळवटी जो कोणी
बैसला काय वाणू त्याला मना माजी
ज्ञानदेव म्हणे तरलो तरलो
आता उद्धरलो गुरुकृपे

दत्तात्रेयांच्या सगुण रूपात ब्रम्हा विष्णू आणि महेश हे तीनही देव संमिलीत झाले आहेत अशा या दत्तात्रेय प्रभूंना अखंड वंदन करतो गुरुदेव दत्त कृपा करा.

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### महिला आरक्षण व सत्य

आताच्या महिला स्वतःला ऊच्च शिक्षित, नोकरी करणार्या, सर्व क्षेत्रात भाग घेण्याची तयारी दर्शवित आहे. देश व समाज बदलत आहेत. महिलांनी मिळविलेली आघाडी बदल जागरूकता व सक्रियता अडथळे दूर करत आहेत. 33 टक्के आरक्षण कागदावर आहे. लोकसभेत व आतापर्यंतच्या निवडणुकीत महिलांची राष्ट्रीय सरासरी 10/15 टक्के वर गेलेली नाही, यावरून आपण काय बोध घेणार? पण संथपणे सर्व पक्ष सहमत झाले आहे परंतु पुरूषप्रधान राजकारणातील पुरूषी अंहकार त्यांच्याकडे संशयाने व पुरूषी तुच्छतेने पाहतो. समाजाची पारंपारिक विचारसरणी त्यांना मर्यादेची आठवण करून देतो. जुनी सरंजामशाही वृत्ती त्यांचा रस्ता अडवतेच. महिला हा स्वतःमधे एक वर्ग तर आहेच. पण सर्व वर्गाचा हिस्साही आहेत. यावरून असे वाटते की, राजकारणाची सूत्रे त्याच्या हाती येतील, तेव्हा एक समानतेवर आधारीत जगाचे स्वप्न जवळ आलेले असेल, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही! आज एवढे पुरे.. तुम्ही वाचत रहा सुखदुःखाचे तरंग माणसा- माणसाचे. आवडले तर लाईक व शेअर करा.सुप्रभात.

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

**आदिशक्ती**

आदिशक्ती आहे खरी
देवी पार्वती जगतजननी
भक्तांना संकटात रक्षिते
महाकाली,दुर्गा,चंडीका
अवतार धारण करुन
दुष्टांचा नाश करते

आदिशक्ती,अबा,जगदंबा
नावे तुझी वेगळी
भक्तांवरी तुझी माया
देवी माता संकटात
आशीर्वादरुपी धरावी सदा
डोई कृपेची छाया

# कुलस्वामिनी प्रतिष्ठानतर्फे दुष्काळग्रस्त १५० शेतकरी कुटुंबांना महिनाभराचा किराणा आणि दिवाळीचा फराळ!

## दांडिया उत्सवाच्या माध्यमातून व दानशूरकडून उभारला ३.३१ लाखांचा निधी; दिवाळीपूर्वी थेट घरी जाऊन पोहोचवणार मदत !

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - सण-उत्सव केवळ मनोरंजनापुरते मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकी जपत दुष्काळग्रस्त बळीराजाला मदतीचा हात देण्याचे काम येथील कुलस्वामिनी प्रतिष्ठानने केले आहे. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या मोफत दांडियाच्या माध्यमातून जमा झालेल्या निधीतून व इतर मान्यवर व्यक्ती ने दिलेले अर्थ सहाय्य यातुन दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांना एक महिना पुरेल इतका किराणा किट आणि दिवाळीनिमित्त मिठाई/फराळ वाटप करण्याचा संकल्प प्रतिष्ठानने सोडला आहे.

या वर्षी नवरात्रोत्सवात महिला, मुली व जोडप्यांसाठी मोफत दांडियाचे आयोजन करण्यात आले होते . या मधे दररोज २५० ते ३०० नागरिकांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेऊन दुष्काळ निधीचे आवाहन नुसार जवळपास ३० हजार रु दुष्काळ निधी म्हणुन जमा केला. तसेच कुलस्वामिनी प्रतिष्ठान मित्रमंडळाकडून १.५० लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला. नूतन विद्यालय, सेलू येथील १९८२-८३ च्या दहावीच्या बॅचच्या मित्रमंडळाने १.५१ लाख रुपयांची मदत केली.

कुलस्वामिनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विलास कोरडे यांनी सांगितले की आतापर्यंत ३ लाख ३१ हजार रुपयांचा निधी जमा झाला आहे.

व्यासपीठावर ४ शेतकरी कुटुंबांचा प्रातिनिधिक सन्मान-

या उपक्रमाचा शुभारंभ दांडियाच्या मुख्य व्यासपीठावर प्रातिनिधिक स्वरूपात शेतकरी कुटुंबांचा सत्कार करून करण्यात आला. यामध्ये:

१) श्री. विजय व सौ. कविता चव्हाण (रा. जटवाडा)

२) श्री. मधुकर व सौ. वैशाली (रा. राहापट्टी तांडा)

३) श्री. भाऊसाहेब व सौ. कमल मोराळकर (रा. सावंगी)

४) श्री. बाबासाहेब व सौ. रेणुका ओताडे (रा. हर्सूल)

या कुटुंबांना व्यासपीठावर सन्मानपूर्वक बोलावून मा.विजय जाधव ( पर्यटन उपसंचालक), गायकवाड शिवाजी , नगरसेवक माधुरी ताई अदवंत ,सौ मीना खरात, सौ अलका कोरडे,विलास कोरडे यांचे हस्ते किराणा किट प्रदान करण्यात आले.कार्यक्रम संचलन संजय राठोड यांनी केले तर सर्वांचे आभार विलास कोरडे यांनी मानले.

दिवाळीपूर्वी थेट शेतात जाऊन वाटप- उर्वरित गरजू शेतकरी कुटुंबांचे सर्वेक्षण सध्या सुरू असून, दिवाळीच्या आधी कुलस्वामिनी प्रतिष्ठानचे कार्यकर्ते थेट दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतातील घरी जाऊन किराणा किट आणि मिठाई सुपूर्द करणार आहेत.




# चुडाराम बल्हारपुरे यांच्या जत्रा घडली नागोबाची लोकनाट्यास सातवा राज्यस्तरीय पुरस्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

गडचिरोली - दत्तात्रय कृष्ण सांडू प्रतिष्ठान, चेंबूर (मुंबई) या संस्थेतर्फे दरवर्षी मराठी साहित्यिकांसाठी राज्यस्तरीय उत्कृष्ट वाड्.मय स्पर्धा घेण्यात येते. व पुरस्कारप्राप्त साहित्यिकांना प्रतिष्ठानच्या वार्षिक साहित्य संमेलनात उत्कृष्ट साहित्यिक पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. राष्ट्रीय स्तरावर अत्यंत मानाचा व दर्जेदार समजला जाणाऱ्या या पुरस्काराकरीता मराठी नाट्य साहित्य प्रकारात विदर्भातील प्रसिध्द नाटककार चुडाराम बल्हारपुरे यांच्या मधुश्री पुणे प्रकाशित जत्रा घडली नागोबाची या लोकनाट्यास यंदाचे नाट्यलेखनाचे पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे दत्तात्रय कृष्ण सांडू प्रतिष्ठानचे विश्वस्त व संस्थापक आनंद सांडू यांनी कळविले असून चेंबूर (मुंबई) येथील सांडूवाडी प्रतिष्ठानात लवकरच हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, सन्मानचिन्ह, सन्मान वस्त्र, व सन्मानपत्र असे आहे.

विशेष म्हणजे या नाटकास यापूर्वी साहित्य विहार संस्था, नागपूर यांचा डॉ. प्रज्ञा निनावे पुरस्कृत उत्कृष्ट नाट्यलेखन पुरस्कार- २०२५,(२) अ.भा. मातोश्री जिजाऊ परिवर्तन सामाजिक शिक्षण संस्था, गोंदिया यांचे नटसम्राट पुरस्कार -२०२६, (३) यशदा पुणे, संवाद पुणे, पुणे महानगर पालिका, व मराठी भाषा संवर्धन समिती, पुणे यांचे उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कार - २०२६.(४) शिवांजली साहित्यपीठ, चाळकवाडी (ता. जुन्नर, जि.पुणे) यांचा स्व. सयाजी चाळक स्मृती उत्कृष्ट नाट्यलेखन पुरस्कार-२०२६ व (५) महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा- दामाजीनगर यांचा शहिद राजकुमार ठोंबरे स्मृती उत्कृष्ट नाट्यलेखन पुरस्कार-२०२६ व (६) स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट, डाकेवाडी (जि. सातारा) यांचे श्री राजाराम डाकवे (तात्या) स्मृती पुरस्कार-२०२६ असे सहा पुरस्कार प्राप्त झाले असून हा सातवा पुरस्कार आहे.

चुडाराम बल्हारपुरे यांच्या या यशाबद्दल आनंद इंदिरा श्रीधर सांडू (साहित्यिक), मधुश्री प्रकाशनचे प्रकाशक पराग लोणकर, व नाट्यश्रीच्या तसेच झाडीपट्टीच्या कवी, साहित्यिक व कलावंतांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.




# साताऱ्यात गुरुवारी मस्ती भरा है समा कार्यक्रम

## दीपलक्ष्मी पतसंस्था व सुहाना सफर सिंगर्स क्लबतर्फे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

सातारा - येथील दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था आणि सुहाना सफर सिंगर क्लब सातारा यांच्या वतीने मस्ती भरा हे समा ही हिंदी गीतांची सुश्राव्य मैफल गुरुवार दिनांक २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजता दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉल येथे आयोजित करण्यात आली आहे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन शिरीष चिटणीस उपस्थित राहणार आहेत कार्यक्रमाची संकल्पना व संयोजन विजय साबळे यांचे आहे सूत्रसंचालन दिपाली गीते करणार असून ध्वनी व्यवस्था सचिन शेवडे सांभाळणार आहेत या मैफिलीमध्ये विजय साबळे, शिरीष खुटाळे, डॉक्टर सुनील पटवर्धन, डॉ. हेमंत मांडवे डॉक्टर सुहास पाटील, चंद्रशेखर बोकील, सचिन शेरकर, मिलिंद हर्षे, शिवकुमार, सलाम अली, मंजुषा पोतनीस, सुषमा बगाडे, स्मिता शेरकर, कविता शिवकुमार, रेवती बंड, ममता नरहरी, दिपाली घाडगे, श्रुती बेंद्रे, स्मिता कोरपे, कलाचंद, मीनाक्षी मांडवे हे कलाकार गाणी सदर करणार आहेत सर्वांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.







सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906



# ॥ श्री गणेश चिंतन ॥

*समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"*

**कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे**

११. म्हणून शेवट पुन्हा पहिल्या ओवीतच येतो
म्हणौनी सद्गुरु वर्णवेना । हे गे हेचि माझी वर्णना ।
अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती ॥ ३१॥
पहिली ओवी—"सद्गुरु वर्णवेना."
शेवटची ओवी—"सद्गुरु वर्णवेना."
पण मध्ये समर्थांनी ३० ओव्या का सांगितल्या?
कारण वर्णन करून सद्गुरू पकडायचे नव्हते. तर प्रत्येक उपमा मोडत-मोडत आपल्याला त्या अवस्थेपर्यंत न्यायचे होते जिथे—शब्द थांबतात.कल्पना थांबते.तुलना थांबते.
आणि अंतर्मुख अनुभव सुरू होतो.
म्हणून शेवटची ओळ—"अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती."
ही संपूर्ण सद्गुरुस्तवनाची किल्ली आहे.
■ आजचा गूढार्थ
आजपर्यंतच्या चार टप्प्यांकडे पाहिले तर एक अद्भुत प्रवास दिसतो
गणेश→ "अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा"
शारदा→ "शब्दाचें अभ्यांतर । उकलून दावी"
सद्गुरू→ "समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी"
आणि शेवटी—"अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती."
म्हणजे बाह्य देवतेपासून अंतःस्थितीपर्यंतचा प्रवास.
ही मांडणी समर्थांनी या चार वाक्यांत "क्रम" म्हणून सांगितलेली नाही; हा त्यांच्या सलग स्तवनांचा तात्त्विक समन्वय आहे. पण म्हणूनच तो इतका सुंदर वाटतो.
■ आजची एक ओळ मनात ठेवूया—
"सद्गुरू आपल्याला काहीतरी नवीन देतात, यापेक्षा—आपण जे नाही ते दूर करून आपण जे आहोत ते दाखवतात."
"गणेश → शारदा → सद्गुरु → राघव : समर्थांच्या पहिल्या चार स्तवनांमधला अंतर्मार्ग"
इथे आपण पुन्हा मनाचा श्लोक १ — "गणाधीश... नमूं शारदा... गमूं पंथ आनंत या राघवाचा असे चिंतन करू या आणि आतापर्यंतच्या सर्व विवेचनाला एकत्र बांधू या)
यात आतापर्यंतचे संपूर्ण सूत्र एकत्र बांधू या
गणेश → बोधरूप
शारदा → शब्दाचे अंतरंग उलगडणारी
चत्वार वाचा → वैखरीपासून अंतर्मुख प्रवास
सद्गुरू → समूळ अज्ञानाचा ठाव पुसणारे
"सद्गुरु वर्णवेना" → शब्दांच्या पलीकडील अंतःस्थिती
राघव → परमार्थाचा अंतिम आश्रय
(क्रमशः)

# विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



## साधेपणातलं सौंदर्य आणि सामर्थ्य

यासाठी महागड्या वस्तूंची गरज नसते. लागते ती फक्त संवेदनशील मनाची!
साधेपणा म्हणजे आपल्याकडे काय नाही, याची खंत नव्हे; तर आपल्याकडे जे आहे, त्यात आनंदाने जगण्याची आणि जे नाही, त्यासाठी स्वाभिमानाने प्रयत्न करण्याची वृत्ती.
साधा माणूस म्हणजे कमकुवत माणूस नव्हे. उलट, स्वतःची किंमत सिद्ध करण्यासाठी सतत दुसऱ्याला कमी न लेखणं, यश मिळालं तरी पाय जमिनीवर ठेवणं, अपयश आलं तरी स्वतःला सावरणं आणि अधिकार असूनही नम्र राहणं—यासाठी मोठं सामर्थ्य लागतं.
ज्याला स्वतःच्या गुणांची जाणीव आहे, त्याला प्रत्येक वेळी स्वतःचं कौतुक करून घेण्याची गरज नसते. ज्याचा स्वाभिमान मजबूत आहे, तो दिखाव्यासाठी कर्जाचा बोजा उचलत नाही. ज्याचं मन समृद्ध आहे, तो दुसऱ्याच्या यशाने जळत नाही; उलट त्याच्या आनंदात सहभागी होतो.
साधेपणा माणसाला स्वतःशी प्रामाणिक राहायला शिकवतो. गरजा आणि हव्यास यांतील फरक समजावतो. अनावश्यक स्पर्धेपासून दूर ठेवतो आणि जीवनातील खऱ्या मूल्यांची जाणीव करून देतो.
जगासमोर मोठं दिसण्यासाठी मुखवटा घालावा लागतो; पण मनाने मोठं होण्यासाठी स्वतःसारखं राहण्याचं धैर्य लागतं.
स्वतःला सिद्ध करण्यासाठी आयुष्य खर्च करू नका. स्वतःला घडवण्यासाठी, माणसं जोडण्यासाठी आणि कोणाच्या तरी आयुष्यात थोडासा आनंद पेरण्यासाठी जगा.
कारण साधेपणाचं सौंदर्य चेहऱ्यावर दिसतं; पण त्याचं सामर्थ्य दुसऱ्याच्या मनात उमटतं.
आणि शेवटी माणसाच्या आयुष्याचं खरं यश हे नसतं की त्याच्याकडे किती मोठं घर होतं; तर हे असतं की त्याच्या साध्याशा उपस्थितीने किती घरांत आनंद फुलला!
मोठं होण्यासाठी श्रीमंती आवश्यक नाही; मन श्रीमंत असलं की साधं आयुष्यही असामान्य बनतं!
ज्या दिवशी तुम्ही बाह्य दिखाव्याचा पाश तोडून साधेपणाच्या मार्गावर चालायला सुरुवात कराल, त्याच दिवशी तुमच्या 'विचार ते विजय' या महाप्रवासाला एक विलक्षण ताकद, शांतता आणि खरीखुरी उंची प्राप्त होईल!



# महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

## 'गुरू' - अज्ञानातून प्रकाशाकडे नेणारा चैतन्यदीप

आपल्या संस्कृतीत आई ही प्रत्येकाची पहिली गुरू मानली जाते. ती आपल्याला बोट धरून चालायला शिकवते, बोलायला शिकवते. पण आईनंतर आयुष्यात ज्याचे स्थान सर्वोच्च असते, तो म्हणजे गुरू. आई आपल्याला देहाचा जन्म देते, तर गुरू आपल्याला ज्ञानरूपी दृष्टी देऊन विचारांचा 'दुसरा जन्म' देतो! म्हणूनच गुरूला आपल्या संस्कृतीत 'द्विज' बनवणारा खरा शिल्पकार मानले आहे.
आपल्याला शाळा-महाविद्यालयांत लौकिक ज्ञानदान करणारे शिक्षक आणि भवसागराच्या पारमार्थिक मार्गावर हात धरून चालवणारे सद्गुरू—अशा दोघांच्याही कृपेने मानवी जीवन परिपूर्ण होते.
जे जे कोणी आपल्याला आपल्या भल्यासाठी काही का होईना शिकवून जाते, अशा सर्व व्यक्तींना गुरुस्थानी मानून आपण त्यांच्याप्रती सदैव कृतज्ञ राहिले पाहिजे.
भारतरत्न लता मंगेशकरांनी जेव्हा गायन क्षेत्रात प्रवेश केला, तेव्हा अनेक ज्येष्ठ संगीतकारांनी त्यांना नवनवीन गोष्टी शिकवल्या.
लतादीदी त्या प्रत्येकाकडून अत्यंत आदरपूर्वक शिकत गेल्या; त्यातूनच त्यांची संगीत विश्वातील उत्तुंग कारकीर्द घडली. गुरू आध्यात्मिक असोत वा व्यावहारिक जीवनातील, त्यांच्याप्रती निष्ठा आणि संपूर्ण समर्पणाचा भाव असायला हवा, तरच आपली खरी प्रगती होते.

# शहाजीराजे व तंजावरच्या मराठा राजांच्या समाध्यांच्या जीर्णोद्धारासाठी एकत्र येण्याचे पांडुरंग बलकवडे यांचे आवाहन

**पुणे पुस्तक जत्रामधील मराठ्यांचे दक्षिण भारतातील कर्तृत्व परिसंवादात शहाजीराजांच्या लोककल्याणकारी राज्याचे व जिंजीच्या ऐतिहासिक संघर्षाचे विस्तृत विवेचन**

**ज्योतिर्मय साहित्य**
(मागील अंकावरून)

प्रजेच्या व्यावहारिक आणि आध्यात्मिक कल्याणासाठी तंजावरच्या मराठा राजांनी महत्त्वाच्या संस्कृत नाटकांचे मराठीत भाषांतर केल्याचे डॉ. मोरे यांनी सांगितले. चाणक्य आणि चंद्रगुप्त मौर्य यांच्या राजकीय संघर्षावर आधारित मुद्राराक्षस या नाटकाचे भाषांतर प्रजेला राजकीय व व्यावहारिक व्यवहार समजावा म्हणून केले. तसेच प्रजेला भारतीय तत्त्वज्ञान आणि आध्यात्मिक ज्ञानाची ओळख व्हावी यासाठी प्रबोधचंद्रोदय या नाटकाचा अनुवाद करण्यात आला.



तंजावरच्या मराठा राजांनी केवळ परंपरा जपल्या नाहीत, तर युरोपीय संपर्कातून आलेला आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनही स्वीकारला. त्यांनी डोळ्यांच्या शस्त्रक्रियेवर ग्रंथ लिहिले आणि कार्य केले. त्यांनी प्रसिद्ध सरस्वती महाल ग्रंथालय अत्यंत समृद्ध केले आणि विविध भाषांतील ज्ञानाचे जतन केले, असे डॉ. मोरे यांनी नमूद केले.

मद्रास (चेन्नई) हे दक्षिण भारतातील आधुनिक ज्ञान, विज्ञान आणि प्रबोधनाचे प्रमुख केंद्र राहिले आहे. डॉ. सदानंद मोरे यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष असताना तंजावर येथील ऐतिहासिक मराठी कागदपत्रांच्या लिप्यंतरणाचा प्रकल्प सुरू केला होता. दक्षिण भारतातील मराठ्यांच्या या ऐतिहासिक योगदानावर आणि तंजावरच्या कागदपत्रांवर आणखी सखोल संशोधन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

कर्नाटकचे आमदार डॉ. मारुतराव मुळे यांनी महाराष्ट्र-कर्नाटक प्राचीन संबंधांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, की महाराष्ट्र आणि कर्नाटक (दक्षिण भारत) यांच्यात १० व्या शतकापासून घनिष्ठ ऐतिहासिक आणि सांस्कृतिक नाते राहिलेले आहे. १६३८ मध्ये आदिलशाहीच्या काळात शहाजीराजांनी बेंगलोरची जहागिरी मिळवली व तेथे राहून स्थानिक लोकांशी समन्वय साधत एक आदर्श, शांतताप्रिय व लोककल्याणकारी राज्य चालवले. उत्तर भारतात परकीय आक्रमणांमुळे प्राचीन मंदिरे व संस्कृती उध्वस्त झाली; परंतु शहाजीराजांच्या दक्षिणेतील वास्तव्यामुळे व संरक्षणामुळे दक्षिण भारतातील प्राचीन हिंदू मंदिरे सुरक्षित राहिली, असे ते म्हणाले.

व्यंकोजी राजे आणि तंजावरच्या मराठा राजांनी दक्षिणेत कला, साहित्य व संस्कृतीला राजाश्रय दिला. सरस्वती महाल वाचनालयात मराठी, तमिळ, संस्कृतसह परदेशी भाषांतील दुर्मिळ ग्रंथांचे जतन केले गेले. भरतनाट्यम या नृत्यकलेला थेट राजाश्रय देऊन समृद्ध करण्यात आले. तसेच धनवंतरी महालद्वारे वैद्यकीय व आरोग्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले गेले. छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजयाद्वारे दक्षिणेत प्रवेश करून स्थानिकांशी कौटुंबिक व सांस्कृतिक ऋणानुबंध जोडले. छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर राजाराम महाराजांना कर्नाटकातील केळदीच्या राणीने आश्रय दिला आणि जिंजीच्या किल्ल्यातून मराठ्यांनी तब्बल ९ वर्षे मुघलांविरुद्ध अभूतपूर्व लढा दिला. घोरपडे, पटवर्धन आदी मराठा सरदारांनी कर्नाटकात मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा पाया रचला आणि अनेक शिक्षणसंस्था उभारल्या, असे डॉ. मुळे यांनी सांगितले.

इतिहास अभ्यासक विक्रमसिंह मोहिते यांनी भोसले घराण्याच्या २२५ वर्षांच्या दक्षिण योगदानाचे विवेचन केले. शहाजीराजे, छत्रपती शिवाजी महाराज, व्यंकोजीराजे, संभाजीराजे, राजाराम महाराज, शाहू महाराज यांच्यासह घोरपडे, पटवर्धन आणि पेठे घराण्यांनी दक्षिणेत तब्बल २२५ वर्षे पराक्रम गाजवला. १६७४ मध्ये राज्याभिषेकाच्या वेळी भारतात मुघलांचे ५६-६०% भूप्रदेशावर (१७ सुभे), आदिलशाहीचे ११% आणि कुतुबशाहीचे ९% असे एकूण सुमारे ७५-८०% भूभागावर परकीय राज्य होते; तर स्वराज्य अवघे १.२% होते. औरंगजेबाच्या भावी आक्रमणाचा सामना करण्यासाठी आणि स्वराज्य वाचवण्यासाठी शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजय मोहीम आखून तुंगभद्रा ते कावेरी दरम्यान सामरिक खोली निर्माण केली, असे मोहिते यांनी सांगितले.

शिवाजी महाराजांनी स्वतः ११ ते १२ महिने मोहिमेवर राहून ३,५०० किमीचा प्रवास केला आणि रायगडच्या तिजोरीवर १ रुपयाचाही भार न पाडता १०० हून अधिक किल्ले/ठाणी व २० लाख होन उत्पन्नाचा प्रदेश स्वराज्यात जोडला. सार्वभौमत्वाचे प्रतीक म्हणून सोन्याचा फण, चांदीचा होम आणि इतर नाणी पाडली. पाँडिचेरी, पोर्तो नोव्हो आणि देवापट्टणम या पूर्व किनाऱ्यावरील बंदरांवर मराठ्यांचे वर्चस्व निर्माण झाले. राजाराम महाराज, महाराणी ताराबाई, संभाजी महाराज, संताजी-धनाजी यांनी या सामरिक खोलीचा वापर करून जिंजीच्या ८ वर्षांच्या वेढ्यात आणि एकूण २६ वर्षांच्या संघर्षात ५ लाख सैन्य घेऊन आलेल्या औरंगजेबाला जेरीस आणले. औरंगजेबाची पाच पिढ्यांची गंगाजळी संपली व मुघल सत्तेचा अंत झाला; यामुळे राजपूत, जाट, शिख यांनी आपापली राज्ये पुन्हा स्थापन केली. १९४७ च्या फाळणीच्या वेळी ५४० संस्थाने भारतात राहिली, याचे खूप मोठे श्रेय मराठ्यांच्या दक्षिण पराक्रमाला जाते, असे मोहिते यांनी सांगितले.

जडणघडणचे संपादक डॉ. सागर देशपांडे यांनी बेळगाव व सीमाभागाचा प्रश्न आणि मराठा लाईट इन्फंट्रीच्या पराक्रमाचा उल्लेख केला. शहाजी राजांनी बेंगलोरची स्थापना करून कर्नाटकची पायाभरणी केली, परंतु दुर्दैवाने आज बेळगाव आणि सीमाभागातील ८६४ गावांमधील २० लाख मराठी भाषिक अन्यायाचा सामना करत आहेत. देशाच्या सर्व सीमांचे (चीन, पाकिस्तान, बांगलादेश) रक्षण करण्यासाठी सर्वात आघाडीवर बेळगावचे मराठा लाईट इन्फंट्रीचे जवान आणि कारवारच्या जंगलातील कमांडो असतात. पोर्तुगीजांच्या धार्मिक आक्रमाणातून गोव्यातील हिंदू संस्कृती आणि सप्तकोटेश्वर देवालय टिकवून ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांनी केले, असे ते म्हणाले.

भारताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्राचे नेतृत्व करणाऱ्या पाच प्रमुख शास्त्रज्ञांमध्ये डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. विजय भटकर, डॉ. वसंत गोवारीकर, डॉ. जयंत नारळीकर आणि डॉ. अनिल काकोडकर या मराठी शास्त्रज्ञांचा समावेश आहे. या सर्व शास्त्रज्ञांचे गुरु आणि देशात सर्वाधिक ८६ डी.लिट पदव्या मिळवणारे जागतिक कीर्तिचे शास्त्रज्ञ प्रोफेसर सी. एन. आर. राव हे मूळचे कोल्हापूरचे (देशमुख घराणे) असून सध्या बेंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये कार्यरत आहेत. ''जो पहिल्यांदा देशाचा विचार करतो आणि देशासाठी लढतो, तो मराठा'' हीच मराठ्याची खरी व्याख्या असून हा राष्ट्रनिष्ठेचा वारसा नव्या पिढीने पुढे नेण्याची गरज आहे, असे डॉ. देशपांडे यांनी सांगितले.

पुणे पुस्तक जत्रेचे समन्वयक शिरीष चिटणीस यांनी परिसंवादाच्या प्रास्ताविकेत पुणे पुस्तक जत्रेच्या निमित्ताने या ऐतिहासिक विषयावर सखोल चर्चा घडवून आणणे हा या परिसंवादाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. भाषिक राज्यांची निर्मिती झाल्यानंतर कर्नाटक, हैदराबाद, इंदूर, बडोदा यांसारख्या परराज्यांतील मराठी शाळा बंद पडत आहेत आणि तिथल्या प्रादेशिक भाषांचे मराठीवर आक्रमण होत आहे, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. मराठा साम्राज्य, छत्रपती शिवाजी महाराज आणि शहाजीराजे यांच्या ऐतिहासिक कार्याचे संचित केवळ मराठीपुरते सीमित न राहता हिंदी, इंग्रजी आणि इतर प्रादेशिक भाषांमध्ये अनुवादित झाले पाहिजे. शालेय स्तरावर हुशार असलेले विद्यार्थी दहावीनंतर केवळ सायन्स किंवा व्यावसायिक क्षेत्रांकडे जातात; या विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्रात येऊन मराठीत डॉक्टरेट करावी आणि मराठा इतिहासाचे संशोधन पुढे न्यावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इतिहास संशोधकांना निमंत्रित करणे, कथाकथन स्पर्धा आणि पुस्तक वाचनाचे उपक्रम राबवून नव्या पिढीत इतिहासाविषयी आवड निर्माण केली जात आहे. १६ व्या व १७ व्या शतकात शहाजीराजे आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंजीपर्यंत दाखवलेली दूरदृष्टी, नियोजन आणि हजारो मराठी लोकांचे दक्षिणेत जाऊन स्थानिकांशी एकरूप होणे या सर्व पैलूंचा सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे, असे चिटणीस यांनी सांगितले.

पुढील काळात इतिहास आणि मराठा साम्राज्याशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर केवळ वर्षातून एकदा न थांबता दर दोन महिन्यांनी नियमित परिसंवाद आणि चर्चासत्रे आयोजित केली जातील. आगामी काळात मराठी साहित्य संमेलनासोबतच मराठा साम्राज्य आणि कर्तृत्व या विषयावर आधारित स्वतंत्र साहित्य संमेलन आणि इतिहास संशोधकांसाठी पुरस्कार सुरू करण्याचा मानस असल्याचेही चिटणीस यांनी सांगितले. लोकमान्य टिळकांच्या काळाप्रमाणे पुण्याला पुन्हा एकदा देशाची वैचारिक, राजकीय आणि सांस्कृतिक प्रबोधनाची राजधानी बनवण्याचा प्रयत्न केला जाईल. कर्नाटकातील शहाजीराजे व संभाजीराजांच्या स्मारकांच्या जीर्णोद्धारासाठी पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांपर्यंत विषय पोहोचवून पुण्याकडून पूर्ण पाठबळ दिले जाईल. दक्षिणेतील मराठा वारसा आणि स्मारकांच्या संरक्षणासाठी पुढील महिन्यात एक संपूर्ण दिवसाचे विशेष संमेलन आयोजित केले जाईल. या संमेलनासाठी खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, नामदार छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले,डॉ. मारुतराव मुळे, पांडुरंग बलकवडे, विक्रमसिंह मोहिते आणि इतर मान्यवरांना निमंत्रित केले जाईल. या विषयावर केवळ भाषणे न करता प्रत्यक्ष स्मारकांचे रक्षण आणि ऐतिहासिक दस्तऐवजांच्या जतनासाठी ठोस मोहीम हाती घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

पुणे पुस्तक जत्रेचे संयोजक पी. एन. आर. राजन यांनी सांगितले, की पुणे पुस्तक जत्रेचे हे २४ वे वर्ष असून कोविड काळानंतरही हे प्रदर्शन अत्यंत यशस्वीपणे पार पडत आहे. या पुस्तक जत्रेत पुस्तकांच्या विक्रीसोबतच विविध वैचारिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मराठ्यांचे दक्षिण भारतातील कर्तृत्व या परिसंवादासाठी उपस्थित राहिलेले मुख्य वक्ते आणि इतिहासप्रेमी रसिकांचे त्यांनी स्वागत केले व उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

# ''एकांताचे प्रहर:-हळवे मनस्वी चांदणं गोंदण''

**ज्योतिर्मय साहित्य**
(मागील अंकावरून)



कवी ज्ञानेश्वर लेंडवे यांची ही कविता अतिशय सुक्ष्म तरलं मनोज्ञ दर्शन घडवते. ती कविता काळजाचे अंतरंग घेऊन येते. सांज कलतांना सांज,मोह मदनाचा बाज, झाली सजणसांज, थरकती लाजून पैंजण.. ही एक सृजनशील स्पर्श ओढ या कवितेने दिली आहे. मनाच्या डोह काठी, सजणीची भरली ओटी, या कवितेने एक चटकचांदणं मनमोहिनी आनंद तर दिलाच पण अत्यंत दुःख सल ही तितक्याच संवेदनतेनं आली आहे.हा प्रहर एकांताचा आहे. गोड स्मृतिमोहर ही मन चावळून मनात दंगा करते जसे ''मी आडोशाला उभा/ सावल्यानो नका करू दंगा/

चांदणबनातून वाहते/ माझ्या प्रतिभेची गंगा/ (पृ.१०१) कविता मनाचे पंखपाखरू होऊन मन मुक्त व्यक्त होते ती ओंजळभर शब्दफुलांची पखरणं असते. पावसाची वस्ती, डोळे, प्रीत, साजणी, दिवा, येई धुक्यातून कोण?या अतिशय मर्मबंधी कविता आहेत. कवी ज्ञानेश्वर लेंडवे यांची ही चंद्रचकोरी भावबंध मनस्वी आहे. जी.के ऐनापुरे लिहितात ''या आत्ममग्न कवितेचा हमरस्ता मराठी कवितेच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर असलातरी इतकी शुद्ध कविता मराठीत क्वचितच सापडेल. हे समकालीन वास्तवाचे सम्यक भान ही कविता आहे.पाखराचे डोळे कुठल्या रंगाचे आहे, बेधुंद नाचे सावल्या चांदणं डोईवर घेवुनी,दुर धुक्याच्या पलिकडे माझी राहते साजणी, प्रेमाचा दिवा, मौनाला अक्षरपालवी फुटू लागलेली, तुज-मज प्रीतीसाठी,मूक सावल्यांचे गाणे,सांजवेड्या साजनाच्या मनी उदासीची धून, नाव पैलतीरी येई धुक्यातून कोण?ओल पुनव चांदण्याची, क्षितीज कडा, पुन्हा नव्याने, दुःखात मरतो मी पुन्हा पुन्हा,सुखात नवा जन्म घेतो पुन्हा, ही धून व्याकूळ काळजात दाटलेली, डोळे मिटतो अन् अनुभवतो ती स्पर्शमाया, कोण दृष्टीपल्याड मज लागेना ठाव, घर कुणाचे तिथे पलिकडे तर सावल्यांचा गाव,भेट चांदणंसावल्यांच्या संगतीने, ही संपूर्ण कविता आदिम डोहातल्या चांदणं सावल्या मांडते जसे तिचं मनात एक गाणं होऊन येतं.

''काळीज ओल्या/ जखमांची,
भळभळती मौनवानी/
तुलाच कळतील/सांजबाई/माझ्या ओठातील गाणी''/ (पृ.११६) अतिशय ही मनस्वी तरलं भावना ही कविता व्यक्त करते. कविता किती किती म्हणून छळते तिचा ठाव लागत नाही. ''कविता सोडून जाते मला अर्ध्यावरच कधीकधी-तिच्या सारखीच तीही/तिचा तरी ठाव/ अजूनही कुठे लागलेला?''(पृ.११८) माझे मीपण घेत मौनाचा वसा मुठीत आवळून अंधारयुगाला भेदत जाईन,

हे कवितेचे ठसे पाण्यावर तरंगत ठेवले आहे.हा अंधारपक्षी कवितेची सृजन जाणीव करून देतो.

बंधप्रीतीचे तूटता कामा नये. तू येईपर्यंत माझ्या डोळ्यांतला स्मृतिमोहोर गळणार नाही. ही मनस्वी अद्मम्य इच्छा अंधाराला आरपार करून जाते.या मावळतीच्या बनात या मनाचा चांदवा आठवणीचे पक्षी वेदनेची वलये अक्षरमय करुन जातात.परमेश्वराला प्रार्थना ही मौनातून निघणारी साद अशी की ओसाड माळरानावर हिरवागार होऊ दे!अतिशय उत्तम आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक भाव तरल रचना या कवितेचा मर्मग्राही अनुबंध बांधते. दोन दीपअसे

''माझ्या डोळ्यांतील/ व्याकुळ दोन दीप/
तरंगत चाललेत/पाण्यातून दुर... कुठल्याशा अज्ञात प्रदेशात इतकच खरं/या घडीला ''(पृ.१२६) कवी ज्ञानेश्वर लेंडवे यांचा एकांताचे प्रहर हे अतिशय मनस्वी चिंतन मंथन मर्मबंध सांगणारी कविता आहे.डॉ. रणधीर शिंदे सर याची पाठराखण अशी ''आईचे दुध आणि प्रियतम ओढीचा कल्पनाबंध लेंडवे यांच्या कवितेतून अभिव्यक्त झाला आहे.तसेच मिथकावलीची सावली देखील तीवर आहे. आंतरिकिकरणाला महत्व देणारा हा शब्दबंध आहे.


कवी ज्ञानेश्वर लेंडवे — डॉ. प्रभाकर शेळके

नादबंधाची एक प्रदीर्घ सुरावट कवितेत आहे.

कर्णवेल्हाळ शब्दबंधनाने या कवितेचे रूपसौंदर्य अधिक वर्धमान झाले आहे.''अशी ही हळवे काटेरी गोंदण देऊन जाणारी ज्ञानेश्वर लेंडवे यांची कविता. ठसा प्रकाशनाची

निर्मिती अप्रतिम झाली आहे.मनस्वी शुभेच्छा.
एकांताचे प्रहर:-(कवितासंग्रह)
कवी:-ज्ञानेश्वर लेंडवे
प्रकाशक:-बुध्दभूषण साळवे,
ठसा प्रकाशन गृह, नासिक
मुखपृष्ठ:-दिनकर मनवर
रेखाटने:-श्रीधर अंभोरे, मिलिंद कडणे
प्रथमावृती:-२८ ऑगस्ट २०२६
पृष्ठ १२६ किंमत ३००/रुपये
पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके जालना

**

# शांतिनिकेतनातील 'स्वावलंबन' प्रयोग आणि गांधीटागोर भेट

**ज्योतिर्मय साहित्य**

मी ५ वर्षापूर्वी 'वीणा टूर्स अँड ट्रॅव्हल' तर्फे यूरोप ट्रिप केली. त्यावेळेस मला माझा भाचा आणि माझ्या जावयाची मावशी जे मँचेस्टर आणि लंडन येथे राहतात त्यांच्याकडे ८-१० दिवस राहायला जायचे असल्याने पॅरिस या ठिकाणी वीणा वर्ल्डची ट्रिप ब्रेक करून पॅरीस ते लंडन 'युरो स्टार' ट्रेनने आम्ही गेलो. मँचेस्टर येथे भाच्याकडे रहात असताना लक्षात आले ते असे, त्यांच्याकडे स्वतःची सर्व कामे स्वतः करण्याबरोबरच पती-पत्नी दोघेही नोकरी करत आणि एक दिवसाआड स्वयंपाक तसेच मुलाला शाळेत सोडणे आळीपाळीने दोघांचेही काम असे. महात्मा गांधी यांनी २० व्या शतकाच्या पूर्वार्धातच अशा पद्धतीच्या सवयी



समाजात जोपासण्याचा पायंडा स्वतः पासूनच सुरू केला होता.

महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ टागोर यांची भेट केवळ दोन महान व्यक्तिमत्त्वांची वैयक्तिक मैत्री नव्हती; ती आधुनिक भारताच्या शिक्षण, समाजप्रबोधन आणि राष्ट्रनिर्माणाच्या दोन दृष्टिकोनांची ऐतिहासिक भेट होती. १९१५ च्या मार्चमध्ये गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून परतल्यानंतर शांतिनिकेतनात आले. तेथे त्यांनी विद्यार्थी, शिक्षक आणि आश्रमवासी यांच्यासमोर स्वावलंबनाचा विचार मांडला. १० मार्च १९१५ रोजी सुरू झालेला हा प्रयोग अल्प काळ टिकला, तरी त्याचा सांस्कृतिक व शैक्षणिक ठसा इतका खोल होता की आजही शांतिनिकेतनात १० मार्च हा दिवस 'गांधी दिन' किंवा 'गांधी पुण्याह दिन' म्हणून साजरा केला जातो.




१९१५ हे वर्ष गांधीजींच्या जीवनात व भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात विशेष महत्त्वाचे आहे. जानेवारी १९१५ मध्ये ते दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले. तेथे वीस वर्षांहून अधिक काळ त्यांनी वसाहतविरोधी चळवळ, सत्याग्रह, सामाजिक समता आणि स्वावलंबन यांचा सराव केला होता.

(क्रमशः)

# कुटुंब प्रमुख हवा आहे !- भाग १३: मनोनिग्रह आणि संस्कृत संस्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

''आजोबा, तुम्ही म्हणालात की आपल्या प्राचीन ज्ञानपरंपरेचा मोठा खजिना संस्कृत भाषेत आहे. पण अमेरिकेत राहून आम्ही संस्कृत कसे शिकणार?'' श्रीरामने विचारले.

''का नाही? संस्कृत भारती ही एक सेवाभावी संस्था आहे. ती अनेक देशांमध्ये संस्कृत संभाषणाचे वर्ग चालवते. अमेरिकेतही तिचे कार्य सुरू आहे,'' आजोबा म्हणाले.

''आजोबा, लॉस एंजेलिसजवळही तिचे केंद्र आहे का?'' श्रीरामने उत्सुकतेने विचारले.

''हो. कॅलिफोर्नियातील सिमी व्हॅली येथे संस्कृत भारतीचे अधिकृत केंद्र कार्यरत आहे. तेथील भारतीय समुदायात संस्कृत भाषेचा प्रसार करण्याचे महत्त्वाचे कार्य केले जाते. संस्कृत शिकण्यासाठी केवळ व्याकरणाचे नियम पाठ करणे पुरेसे नाही; प्रत्यक्ष संभाषणातून भाषा वापरता आली, तर ती अधिक सहजपणे आत्मसात करता येते.''

''मग सुट्टीमध्ये मी संस्कृत शिकायला सुरुवात करीन,'' श्रीराम म्हणाला.

''आम्हीही शिकू. निदान घरात तरी संस्कृतमध्ये संभाषण करण्याचा प्रयत्न करू. मुलांबरोबर आम्हालाही आपली भाषा शिकण्याची संधी मिळेल,'' कृष्णकांत आणि पमेला म्हणाले.

''वा! म्हणजे आपल्या घरात संस्कृतमय वातावरण निर्माण होईल. घरात रोज थोडे संस्कृत बोलले, तर शिकण्याची गोडी वाढेल,'' आजोबा आनंदाने म्हणाले.

''आजोबा, संस्कृत शिकल्यामुळे मनाचे श्लोक समजायलाही मदत होईल ना?'' श्रुतकीर्तीने विचारले.

''अर्थात! भाषा समजली की शब्दांचा अर्थ अधिक स्पष्ट होतो. अर्थ समजून घेतला, तर त्यातील विचार आपल्या जीवनात उतरवता येतात. चला, आता मनाच्या श्लोकांकडे वळू या.'' आजोबांनी पुढील श्लोक सांगितला.

मना वासना दुष्ट कामा न ये रे।
मना सर्वथा पापबुद्धी नको रे।।
मना धर्मता नीति सोडूं नको हो।
मना अंतरी सार वीचार राहो।।४।।

''मुलांनो, या श्लोकात समर्थ मनाला अयोग्य इच्छा आणि पापबुद्धीपासून दूर राहण्यास सांगतात. आपल्याला एखादी गोष्ट हवीशी वाटली, तरी ती मिळवण्यासाठी चुकीचा मार्ग स्वीकारू नये. आपली इच्छा योग्य आहे का, तिच्यामुळे कुणाचे नुकसान होईल का आणि आपले वर्तन न्याय्य आहे का, याचा विचार करावा, उदाहरणार्थ, परीक्षेत चांगले गुण मिळवण्याची इच्छा असणे चांगले; पण त्यासाठी नक्कल




करणे चुकीचे. खेळात जिंकण्याची इच्छा असणे स्वाभाविक; पण प्रतिस्पर्ध्याशी फसवणूक करणे योग्य नाही. दुसऱ्याजवळ एखादी वस्तू आहे म्हणून ती आपल्यालाही मिळालीच पाहिजे, असा हट्ट धरणेही योग्य नाही. म्हणून इच्छा असाव्यात; परंतु त्यांना विवेकाची जोड असावी.

सत्य, नीती आणि सदाचार यांचा मार्ग सोडू नये. कोणताही निर्णय घेताना त्याचे परिणाम विचारात घ्यावेत. राग किंवा लोभाच्या भरात निर्णय घेण्याऐवजी क्षणभर थांबून विचार करावा. हाच या श्लोकाचा मुख्य संदेश आहे,'' आजोबा म्हणाले.

''म्हणजे काही करण्यापूर्वी ते योग्य आहे की अयोग्य, याचा विचार करायचा!'' श्रीराम म्हणाला.

''अगदी बरोबर! मनाला योग्य दिशा देण्याचा सराव केला, तर आपल्या निर्णयांत आणि वागण्यातही सुधारणा होऊ शकते. चांगले विचार, योग्य निर्णय आणि चांगले आचरण यांचा एकमेकांशी जवळचा संबंध आहे,'' आजोबा म्हणाले.

''आजोबा, आम्ही संस्कृतही शिकू आणि मनाच्या श्लोकांप्रमाणे वागण्याचाही प्रयत्न करू,'' श्रुतकीर्ती म्हणाली.

''छान! ज्ञान मिळवणे महत्त्वाचे आहेच; पण ते आचरणात आणणे त्याहून महत्त्वाचे आहे,'' आजोबा म्हणाले.

क्रमशः भाग १४ - विवेक, नीती आणि सदाचार

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559